॥ श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥

# ॥ श्रीपाद सेवा मंडळ ॥

विश्वस्त नोंदणी क्रमांक. ए १९९३ पुणे / २५-१-१९९१

'श्रीगुरुकृपा', श्रीसंत मामासाहेब देशपांडे पथ,
आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१

**फोन :** (०२०) २४३५१८४० / २४३५३२७१

**Email :** contact@ssmandal.org **Web :** www.ssmandal.org

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

# वार्षिक कार्यक्रम पत्रिका

● २०२६-२०२७ ●

सकल सद्‌गुरुभक्त बंधुभगिनींना,

श्रीचरणस्मरणपूर्वक सस्नेह नमस्कार वि.वि.

आपणां सर्वांना नूतन वर्षाच्या अनेकानेक हार्दिक शुभेच्छा ! दरवर्षीप्रमाणेच आजही प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या छत्तिसाव्या; आणि प.पू.सद्‌गुरु मातुःश्री सौ.शकुंतलाताई आगटे ह्यांच्या सातव्या; एकत्रित पुण्यतिथी-महोत्सवाच्या मंगल पर्वावर, '**श्रीपाद सेवा मंडळा**'ची ही '**वार्षिक कार्यक्रम पत्रिका**' आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे.

आपणां सर्वांच्या हार्दिक शुभकामना आणि अकृत्रिम आपुलकीने मिळणारे प्रत्यक्ष सहकार्य यामुळे मंडळाच्या नियोजित कार्याला निश्चितपणे मोठाच हातभार लागत आहे. नवीन वर्षातही आपणां सर्वांचे असेच प्रेमळ सहकार्य मंडळाला सतत आवर्जून लाभावे अशी श्रीसद्‌गुरुचरणीं विनम्र प्रार्थना आहे !

पुण्यतिथी महोत्सवाच्या या पुण्यमंगल-पर्वाच्या निमित्ताने आपले सद्‌गुरुप्रदत्त नित्यसाधन; मानसजप, मानसपूजा, सामुदायिक साधना, नित्योपासना वगैरे; न चुकता प्रेमाने करीत जावे ही सगळ्यांनाच कळकळीची प्रार्थना आहे. आपणां सर्वांचे कुशल इच्छितो. कळावे ही विनंती.

**पुणे :**
'श्रीपाद नवमी',
फाल्गुन कृ.९, श्रीशके १९४७
दिनांक : १२ मार्च २०२६

**आपले कृपाभिलाषी,**
विश्वस्त आणि संचालक,
'श्रीपाद सेवा मंडळ', पुणे.

## वार्षिक कार्यक्रमांची रूपरेषा : २०२६-२०२७

**मार्च २०२६ :**

**(१) राजाधिराज सद्‌गुरु समर्थ श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचा प्रकटदिन महोत्सव :** चैत्र शु.२ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी; चिपळूण येथे मार्कंडी मठात मुख्य उत्सव संपन्न होईल.

**एप्रिल २०२६ :**

**(२) राजाधिराज सद्‌गुरु समर्थ श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव :** चैत्र कृ.१३ श्रीशके १९४८; बुधवार, दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(३) प.प.श्री.लोकनाथतीर्थ स्वामी महाराज जयंती महोत्सव :** वैशाख शु.१२ श्रीशके १९४८; मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(४) भगवान श्रीनृसिंह जयंती महोत्सव :** वैशाख शु.१४ श्रीशके १९४८; गुरुवार, दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी; श्रीक्षेत्र जळगांव (जामोद) येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**मे २०२६ :**

**(५) प.पू.सद्‌गुरु मातुःश्री सौ.शकुंतलाताई आगटे यांचा जयंती महोत्सव :** वैशाख कृ.१४ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक १५ मे २०२६ रोजी; श्रीक्षेत्र आंबेरी येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**जुलै २०२६ :**

**(६) प.प.श्री.वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीचा आणि प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या जयंतीचा महोत्सव :** आषाढ शु.१ आणि आषाढ शु.२ श्रीशके १९४८; बुधवार आणि गुरुवार, दिनांक १५ जुलै २०२६ व १६ जुलै २०२६ रोजी; कऱ्हाड येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(७) देवशयनी (आषाढी) एकादशी :** आषाढ शु.११ श्रीशके १९४८; शनिवार, दिनांक २५ जुलै २०२६ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(८) श्रीगुरुपौर्णिमा महोत्सव :** आषाढ शु.१५ श्रीशके १९४८; बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे असेल. पहाटे ६.३० ते ७.३० सामुदायिक साधना, ७.३० ते ८.३० अल्पोपाहार, चहापान; ८.०० ते १०.३० श्रीसद्‌गुरुपादुका पूजन, अभिषेक, श्रीसत्यदत्तपूजन आणि तीर्थप्रसाद. सकाळी ८.३० ते दुपारी १.३० आणि दुपारी ३.३० ते ६.३० श्रीसद्‌गुरुदर्शन. रात्री ७.३० ते १०.३० प.पू.सद्‌गुरु श्री.मामांचे तसेच प.पू.सद्‌गुरु सौ.शकुंतलाताईंचे राजोपचार पूजन. (श्रीपाद निवासात.)

**मुंबई येथील कार्यक्रम :** मुंबईतील दादर, डोंबिवली, ठाणे, कांदिवली वगैरे सर्व केंद्रांचा हा एकत्रित कार्यक्रम असेल याची कृपया नोंद घ्यावी. रविवार, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी ‘सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज हॉल, वीर सावरकर रस्ता, केटरिंग कॉलेजच्या समोर, दादर (पश्चिम) ४०० ०२८’ येथे श्रीगुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन केलेले असून, त्याला प.पू.सद्‌गुरु श्री. शिरीषदादा पूर्णवेळ उपस्थित असतील. सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळात प.पू.श्री. शिरीषदादांची प्रवचन-सेवा संपन्न होईल. सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत चहापानाची व्यवस्था कार्यक्रमस्थळीच करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी तसेच कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी साधकांनी कृपया मुंबई केंद्र-प्रमुख श्री. जयंत साठे ह्यांच्याशी संपर्क साधावा.

भारतातल्या इतर सर्व केंद्रांनी आपापल्या केंद्रांच्या ठिकाणीच प्रस्तुत उत्सव संपन्न करावयाचा आहे.

**अमेरिकेतील कार्यक्रम :** अमेरिकेतील मुख्य उत्सव डॅलस येथे संपन्न होईल. परदेशांतल्या इतर विविध केंद्रांनी प.पू.श्री.अनिरुद्धदादा आगटे यांच्या सूचनांनुसार एकत्र किंवा वेगवेगळ्या ठिकाणी उत्सवाचे आयोजन करावयाचे आहे.

## ऑगस्ट व सप्टेंबर २०२६ :

**(९) श्रावणमास अनुष्ठान, श्रीशके १९४८ :** या वर्षीचे प.पू.सद्गुरु श्री. शिरीषदादांचे श्रावणमास अनुष्ठान (वैयक्तिक) सालाबादप्रमाणेच श्रीक्षेत्र आंबेरी येथील प्रकल्पस्थानी संपन्न होईल.

दरवर्षीप्रमाणेच 'माउली' येथे श्रावण शु.२ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२६ ते श्रावण कृ.१४ श्रीशके १९४८; गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर २०२६; या काळात संपन्न होणाऱ्या सामुदायिक श्रावण-अनुष्ठान-कार्यक्रमांची दैनंदिन रूपरेषा अशी असेल;

पहाटे ४.३० ते ५.३० सामुदायिक साधना, ६.०० ते ७.०० स्नानादी नित्यकर्मे, ७.०० ते ९.३० अनुष्ठान प्रथम सत्र, ९.३० ते १०.०० चहापान, विश्रांती; १०.०० ते १२.०० अनुष्ठान द्वितीय सत्र, १२.०० ते १२.३० नैवेद्य, आरती, प्रसाद.

दुपारी ३.३० ते ५.०० श्रीज्ञानेश्वरी वाचन, ५.३० ते ६.३० सामुदायिक साधना, ७.०० ते ८.०० आरती; तदनंतर तीर्थ-प्रसाद.

श्रावण-अनुष्ठानकालातील महत्त्वाचे आणि उत्सवांचे दिवस असे आहेत;

**(अ)** **श्रावणी :** श्रावण शु.५ श्रीशके १९४८; सोमवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२६; सकाळी ८.०० ते दुपारी १२.३० पर्यंत. (दरवर्षीप्रमाणे पुण्यातही 'माउली'मध्ये श्रावणीचा कार्यक्रम संपन्न होईल.)

**(ब)** **प.प.श्री.वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज जयंती :** श्रावण कृ.५ श्रीशके १९४८; मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी.

(क) **भगवान श्रीकृष्ण जयंती महोत्सव :** श्रावण कृ.८ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ७.३० ते १.०० पर्यंत जन्मकाळ सोहळा. दुसऱ्या दिवशी; शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी; सकाळी १०.३० ते १२.३० श्रीहरिकीर्तन (काल्याचे कीर्तन) आणि गोपाळकाला.

श्रीक्षेत्र आंबेरी येथील तपोवन-प्रकल्पातील भगवान श्रीकृष्ण मंदिरामध्ये मुख्य उत्सव संपन्न होईल.

(ड) **अनुष्ठान सांगता समारंभ :** श्रावण कृ.१४ श्रीशके १९४८; गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी; दुपारी १२.०० वाजता.

**श्रावणमास-अनुष्ठानासंबंधी विनम्र सूचना :**

**१.** श्रीसद्गुरूंच्या आदेशानुसार, सर्व साधक बंधुभगिनींनी या अनुष्ठान-कालात 'माउली'त अथवा आपापल्या घरी, 'श्रीगुरुचरित्र नित्यपाठ', 'श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार', 'श्रीदत्तलीलामृताब्धिसार', 'श्रीगुरुसाहस्री', 'श्रीस्वामीसमर्थ नामपाठ', 'श्रीदत्तमाहात्म्य', 'श्रीदत्तभावांजली', 'श्रीगुरुगीता' आणि 'श्रीज्ञानेश्वरी' या ग्रंथांची शक्य होतील तेवढी पारायणे पूर्ण करावीत ही विनम्र प्रार्थना ! श्रावणमास समाप्तीनंतर कृपया न चुकता आपापल्या पारायणांची माहिती नोंदीकरिता पुणे मुख्य कार्यालयाला कळवावी, ही कळकळीची विनंती.

**२.** संपूर्ण श्रावणमासात प.पू.सद्गुरु श्री.शिरीषदादांचा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार बंद राहील. याची नोंद घेऊन, कृपया या काळात कोणीही पत्रव्यवहार करू नये ही नम्र विनंती.

**(१०) भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराज यांचा जयंती महोत्सव :** दरवर्षीप्रमाणेच हा मुख्य महोत्सव श्रीदत्तमंदिर-प्रकल्प श्रीक्षेत्र जळगांव (जामोद) येथे; भाद्रपद शु.४ श्रीशके १९४८; मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी; संपन्न होईल.

महोत्सवाचा कालावधी दिनांक १४ व १५ सप्टेंबर २०२६ असा दोन दिवसांचा असेल. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या साधक-सज्जनांनी कृपया प्रकल्प-कार्यालयाला त्याप्रमाणे पूर्वसूचना द्यावी ही विनंती.

**नोव्हेंबर २०२६ :**

**(११) श्रीगुरुद्वादशी महोत्सव, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी :** आश्विन कृ.१२ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर २०२६ रोजी; श्रीसद्‌गुरुआज्ञेनुसार प्रस्तुत महोत्सव 'श्रीक्षेत्र दत्तधाम' येथे संपन्न होईल. उत्सवाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या साधक-बंधुभगिनींनी कृपया पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**डिसेंबर २०२६ :**

**(१२) सद्‌गुरु श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संजीवन-समाधी महोत्सव :** कार्तिक कृ.१३ श्रीशके १९४८; रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी. त्यानिमित्त दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२६ रोजी वर्धा येथे 'कृष्णधाम' प्रकल्पात दोन दिवसांचे साधक-शिबिर आणि मुख्य उत्सव संपन्न होईल. शिबिराला व उत्सवाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या साधक-बंधुभगिनींनी कृपया पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(१३) प.पू.सद्‌गुरु मातुःश्री पार्वतीदेवी पुण्यतिथी महोत्सव :** मार्गशीर्ष शु.८ श्रीशके १९४८; गुरुवार, दिनांक १७ डिसेंबर २०२६ रोजी; कोल्हापूर येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(१४) भगवान श्रीदत्तात्रेय जयंती महोत्सव; श्रीक्षेत्र दत्तधाम, हेळवाक :** मार्गशीर्ष शु.१५ श्रीशके १९४८; बुधवार, दिनांक २३ डिसेंबर २०२६ रोजी. दुसऱ्या दिवशी (गुरुवार, २४ डिसेंबर २०२६ रोजी) पारणे व महाप्रसाद. महोत्सवाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या साधक-बंधुभगिनींनी कृपया पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**जानेवारी २०२७ :**

**(१५) प.पू.सद्‌गुरु योगिराज श्री.वा.द.गुळवणी महाराज जयंती महोत्सव :** मार्गशीर्ष कृ.१३ श्रीशके १९४८; मंगळवार, दिनांक ५ जानेवारी २०२७ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(१६) भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज जयंती महोत्सव :** पौष शु.२ श्रीशके १९४८; शनिवार, दिनांक ९ जानेवारी २०२७ रोजी; पुणे केंद्रात मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(१७) प.पू.सद्‌गुरु योगिराज श्री.वा.द.गुळवणी महाराज पुण्यतिथी महोत्सव :** पौष कृ.८ श्रीशके १९४८; शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी २०२७ रोजी; पुणे केंद्रात मुख्य उत्सव संपन्न होईल.

**फेब्रुवारी २०२७ :**

**(१८) भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराज श्रीशैल्यगमन महोत्सव :** माघ कृ.१, 'श्रीगुरुप्रतिपदा' श्रीशके १९४८; रविवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२७ रोजी; चिपळूण केंद्रात मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(१९) प.प.श्री.लोकनाथतीर्थ स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सव :** माघ.कृ.३ श्रीशके १९४८; मंगळवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२७ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**(२०) प.पू.सद्‌गुरु मातुःश्री सौ.शकुंतलाताई आगटे यांचा आठवा पुण्यतिथी महोत्सव :** माघ कृ.७, 'श्रीप्रिया सप्तमी' श्रीशके १९४८; शनिवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२७ रोजी; श्रीक्षेत्र आंबेरी येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

**मार्च २०२७ :**

**(२१) प.पू.सद्‌गुरु योगिराज श्री.श्री.द.(मामा) देशपांडे महाराज यांचा सदतिसावा; आणि प.पू.सद्‌गुरु मातुःश्री सौ.शकुंतलाताई आगटे यांचा आठवा; एकत्रित पुण्यतिथी महोत्सव :** फाल्गुन कृ.९, 'श्रीपाद नवमी' श्रीशके १९४८; बुधवार, दिनांक ३१ मार्च २०२७ रोजी; पुणे येथे मुख्य उत्सव संपन्न होईल.

---

**श्रीहनुमान जयंती उत्सव :** चैत्र शु.१५ श्रीशके १९४८; गुरुवार, दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी; प्रतिवर्षीप्रमाणे 'माउली' पुणे येथे तसेच श्रीक्षेत्र आंबेरी, श्रीक्षेत्र दत्तधाम आणि श्रीक्षेत्र जळगांव-जामोद या प्रकल्पस्थानीं सूर्योदयसमयी हा उत्सव संपन्न होईल. (प्रस्तुत उत्सव 'परंपरेच्या उत्सवां'त समाविष्ट नाही.)

## ‘श्रीपाद सेवा मंडळ’ आयोजित भक्तियात्रा व कृपायोग-शिबिरे :

सन २०२६-२०२७ दरम्यान होणाऱ्या भक्तियात्रा व कृपायोग-शिबिरांची माहिती त्या त्या वेळी साधकांना साधकनेटवरून कळविली जाईल.

□ □

## महत्त्वाच्या सूचना :

१. ‘श्रीपाद सेवा मंडळा’च्या कोणत्याही कार्यक्रमातील **‘सामुदायिक साधने**’ला येऊ इच्छिणाऱ्या साधकांनी आपले **‘आय-कार्ड’** आणि **‘साधनेचे आसन**’ न चुकता सोबत आणणे गरजेचे आहे. साधनेव्यतिरिक्त उर्वरित कार्यक्रमांत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सज्जनांकरिता मात्र हा नियम लागू नाही.

२. प.पू.सद्‌गुरु श्री.शिरीषदादा, श्रीवामनराज प्रकाशन आणि श्रीपाद सेवा मंडळ यांच्याशी वा इतर कोणत्याही संदर्भात आपण पत्रव्यवहार केल्यास सोबत उत्तरासाठी न विसरता पोस्टेज; (आवश्यकतेप्रमाणे पाकीट, अंतर्देशीय पत्र किंवा कार्ड; आपला पत्ता त्यावर सुवाच्य अक्षरात लिहिलेले;) असावे.

**कृपया पत्राला, पाकिटाला स्टेपल करू नये, चिकटपट्ट्या लावू नयेत; तसेच आतील कागद बाहेरच्या पाकिटाला चिकटणार नाहीत याचीही काळजी घ्यावी,** ही कळकळीची विनंती.

– विश्वस्त आणि संचालक,

**श्रीपाद सेवा मंडळ.**

□ □